महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग ६- अ करिता)

**क्र.पोमसं/५/१०/लो.नि.-२०२४/पोउपनि बदली/०७/२०२४, मुंबई, दि.२७.०२.२०२४**

वाचा :- १. महाराष्ट्र पोलीस अधिनियम - १९५१
२. मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे क्र.437/6/1/INST/ECI/ FUNCT/ MCC/ 2023, दि.२१/१२/२०२३ चे पत्र
३. या कार्यालयाचे क्र. पोमसं.३/ १०/६/निवडणूक आयोग-सूचना/१९०/२०२३, दि. ०३/०१/२०२४ चे ज्ञापन
४. या कार्यालयाचे क्र.पोमसं/५/१०/लो.नि.-२०२४/पोउपनि बदली/०७/२०२४, दि.३०/०१/२०२४ चे आदेश
५. मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या क्र.जीईएन-२०२४/प्र.क्र.१४१/२४/३३, दि. २२/०२/२०२४ चे पत्र
६. या कार्यालयाचे क्र. पोमसं/३/१०/६/निवडणूक आयोग-सूचना/१९०/२०२३, दि. २२/०२/२०२४ चे ज्ञापन
७. पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि. २७/०२/२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त
८. मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या क्र. जीईएन-२०२३/प्र.क्र.७५१/२३/३३, दि.२७/०२/२०२४ चे पत्र.

**-: आ दे श :-**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूका-२०२४ च्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये, मा.केंद्रीय निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना / निर्देशांनुसार सर्व पोलीस आयुक्त व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक या घटक प्रमुखांकडून बदलीपात्र नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांची माहिती उपरोक्त संदर्भ क्र. ३ च्या ज्ञापान्वये मागविण्यात आली होती. त्यानुसार सर्व संबंधीत घटक प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील माहितीची छाननी करुन छाननीअंती बदलीपात्र नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांच्या बदल्या करण्याकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न (२) अन्वये, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी दिलेल्या मान्यतेनुसार, उपरोक्त संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये एकुण १४ नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांची त्यांच्या घटकातून इतर घटकांत बदली करण्यात आली होती.

२. तदूनंतर, मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी उपरोक्त संदर्भ क्र. ५ अन्वये, दिलेल्या र्निदेशानुसार बदलीस पात्र असलेल्या नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांची नव्याने माहिती मागविण्यात आली व त्यानुसार लोकसभा सार्वत्रिक निवडणूका - २०२४ च्या अनुषंगाने नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांची बदली करण्याकरिता संबंधित घटकांकडुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी करुन तपासणीअंती बदलीस पात्र नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांच्या याद्या तयार करण्यात आल्या. लोकसभा निवडणूका- २०२४ च्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी त्यांचे पत्र क्र. आस्था-१ /लोकसभा निवडणूक-माहिती-७५७९०७/२०२४ दि. २४/०२/२०२४ अन्वये सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून आदेश क्र.पोमसं/५/१०/लोकसभा निवडणूक-२०२४/बदली/०७/२०२४, दि.२६/०२/२०२४ अन्वये पोलीस उप निरीक्षकांच्या बदलींचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

३. पोलीस आयुक्त, पिंपरी चिचंवड यांनी त्यांचे यांचे पत्र क्र.आस्था-१/लोकसभा निवडणूक-माहिती-७५९९५८/२०२४ दि.२५.०२.२०२४ अन्वये अधिक ०४ नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांच्या करावयाच्या बदल्याबाबतची माहिती प्राप्त झालेली आहे.

४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न (२) मधील तरतुदींनुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना जनहितार्थ आणि प्रशासकीय निकडीनुसार सक्षम प्राधिकारी म्हणुन प्रदान असलेल्या अधिकाराचा वापर करुन, तसेच, मा. भारत निवडणूक आयोग व मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निंदेशाप्रमाणे खालील नमुद नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षकांच्या त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी बदली करण्याचा पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी मुख्य निवडणूक अधिकारी सल्लामसलतीने निर्णय घेतला असुन, मा. मुख्य निवडणुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांनी उपरोक्त संदर्भ क्र. ८ च्या पत्रान्वये सदरहु बदल्या करण्यास सहमती दिलेली आहे:-

| अ.क्र. | नि:शस्त्र पोलीस उपनिरीक्षक यांचे नाव | सध्याची नेमणुक | नविन नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | कृष्णहरी डी.सपकाळ | पिंपरी चिंचवड | कोल्हापूर परिक्षेत्र |
| २. | संतोष हरिभाऊ येडे | पिंपरी चिंचवड | सोलापूर शहर |
| ३. | श्रीकृष्ण बाळासाहेब दरेकर | पिंपरी चिंचवड | कोल्हापूर परिक्षेत्र |
| ४. | रमेश शंकर पवार | पिंपरी चिंचवड | ठाणे शहर |

27/2/2024

**(संजीव कुमार सिंघल)**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरीता.

**प्रत,**

पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड / ठाणे शहर / सोलापूर शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर

२. उपरोक्त तक्त्यात रकाना क्र. ४ मधील नमुद घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना तात्काळ बजावून त्यांना त्यांच्या पूर्वीच्या घटकात विनाविलंब कार्यमुक्त करावे. तसेच, सदर बदली आदेशाची प्रत त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहीत स्वाक्षरी घ्यावी व ती पोच या कार्यालयास पाठवावी. बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करताना पर्यायी / बदलीवर येणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची वाट पाहू नये. तसेच, संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना पदग्रहण अवधी न उपभोगता तात्काळ बदलीच्या ठिकाणी हजर होण्याचे लेखी निर्देश देखील द्यावेत. संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांना बदलीवर कार्यमुक्त केले नाही, तर त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत घटक प्रमुखांवर राहील. त्याचप्रमाणे बदली आदेशाधीन पोलीस अधिकाऱ्यांना बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही ते त्यांच्या बदलीच्या घटकात विहित वेळेत हजर झाले नाहीत, तर ते शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील.

३. बदलीवरील नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे अथवा मा.न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास ते विचारात घेवून पुढील कार्यवाही करावी.

४. ज्या ठिकाणी स्थानिक निवडणूक संबंधाने आचारसंहिता लागू आहे, त्या ठिकाणांच्या अधिकाऱ्यांना आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर तात्काळ कार्यमुक्त करावे.

५. बदलीवर हजर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना घटकांतर्गत पदस्थापना देताना कार्यकारी पदात नेमणुक द्यावयाची असल्यास मुळ जिल्हयात नेमणुक देण्यात येऊ नये.

६. मा.केंद्रीय निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे व या सूचनांचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. सदरचे आदेश घटक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात येत असून त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असल्यास तसे या कार्यालयास कळवून पुढील आदेशाची वाट पहावी / काही अधिकाऱ्यांची तक्रार असल्यास हया कार्यालयास त्वरित कळवावी.

८. बदली आदेशानंतर जे पोलीस अधिकारी रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्णनिवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

९. उपरोक्त घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नांवे व त्यांच्या घटकातून बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची नावे हजर झालेल्या / कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे पोलीस अधिकारी बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही अद्याप हजर झालेले नाहीत त्यांचा कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवून त्यांच्याविरुध्द घटक प्रमुखांनी या कार्यालयाचे क्र.पोमसं/३/५५०७/०६/९७, दि.१३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील लक्षवेध:- कार्यासन अधिकारी, का.क्र. ५ यांना ई-मेलद्वारे [desk5.dgoffice@mahapolice.gov.in] पाठवावी.

**प्रत सविनय सादर,**

मा.मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२.

**(लक्षवेध :-** कक्ष अधिकारी, पोल-५ब)

महालेखाकार-०१, महाराष्ट्र राज्य, मुंबई / महालेखाकार-०२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

कार्यालय अधीक्षक, का. क्र. ३ / ९ / ११ / ३६ व ४० (पोमसं कार्यालय).

**प्रत,**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोमंस., कार्यालय, मुंबई.

२/- यांनी सदरचे आदेश लोकसभा सार्वत्रिक निवडणुका - २०२४ च्या अनुषंगाने नि:शस्त्र पोलीस उप निरीक्षक यांचे बदली आदेश (Transfer order of Unamrmed Police sub Inspectors for General Elections to Loksabha - 2024) या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर ०१ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.